# चांगली मूल्यमापन साधने-निकष

**डॉ. एच.डी. चित्ते**
सहा. प्राध्यापक एम.एड.
मविप्र समाजाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय
नाशिक

विद्यार्थ्यांचा बोधात्मक, भावात्मक व क्रियात्मक विकास होणे आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करतांना जे मोजायचे आहे तेच मोजले गेले पाहिजे. त्यामुळे मूल्यमापन साधने तेवढे अचूक, निर्दोष असले पाहिजे.

i) सप्रमाणता
ii) विश्वसनियता
iii) वस्तुनिष्ठता
iv) उपयोगिता
v) भेदभाव क्षमता
vi) पर्याप्तता

इत्यादी प्रमुख चांगल्या मूल्यमापन साधनाचे निकष आहेत. सविस्तर एक-एक निकषाची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

**i) सप्रमाणता-**


सप्रमाणतेला, यथार्थता असा ही पर्यायी शब्द मराठीत आहे. तर सप्रमाणतेला इंग्रजीत Validity असे म्हणतात.

विद्यार्थ्यांच्या विकासासंदर्भातील जी बाब मोजावयाची आहे. त्यासाठी चाचणी तयार केली आहे. तीच बाब चाचणीद्वारे मोजली जात असेल तर ती चाचणी सप्रमाण आहे असे म्हणतात.

Validity is a matter of degree. It does not exist on an all or none basis. We may consider validity in terms of categories such as high, moderate or low validity.

एखादे साधन विशिष्ट काळात, विशिष्ट बार्बींच्या बाबतीत मापनासाठी सप्रमाण अथवा यथार्थ असू शकेल मात्र कायम ते साधन सप्रमाण असेल असे नाही.

सप्रमाणतेचे (यथार्थता) चार प्रकार आहेत.




**अ) आशय सप्रमाणता (content validity)-**

यात सर्व घटकांचा समावेश असेल तर चाचणी सप्रमाण आहे असे म्हणतात.

**ब) सहवर्ती सप्रमाणता (concurrent Validity)-**

जर नवीन चाचणी रुढ चाचणीशी मिळतीजुळती असेल, तर त्या चाचणीत सठवर्ती सप्रमाणता आहे असे म्हणतात.

**क) रचना अनुस्यूत सप्रमाणता (construct validity)-**

चाचणीतून जे मोजायचे आहे तेच मोजल जात असेल तर त्या चाचणीच्या रचनेस अनुस्यूत सप्रमाणता असे म्हणतात.

**ड) दर्शनी सप्रमाणता (face validity)-**

चाचणी बघितल्यावर जर लगेच लक्षात येत असेल की, जे मोजायचे आहे तेच मोजले जाणार आहे तर त्याला दर्शनी सप्रमाणता असे म्हणतात.

**ii) विश्वसनीयता-**

विश्वसनीयतेला इंग्रजीत Reliability असे म्हणतात. एकाच बाबींच्या केलेल्या मापनातील सुसंगतीच्या प्रमाणाला किंवा मापनातील सातत्याला विश्वसनीयता असे म्हणतात.

There are various methods for estimating the Reliability

A) Test-Retest Method

B) Parallel Forms Method

C) The Split Half Method

प्रश्नांच्या काठिण्य पातळीमुळे विश्वसनीयतेवर परिणाम होतो.

**iii) वस्तुनिष्ठता-**

वस्तूनिष्ठतेला इंग्रजीत Objectivity असे म्हणतात. उत्तरपुस्तिकेचे मूल्यमापन कोणीही केले तरी मूल्यमापनात फरक पडत नाही. प्रश्नाचे उत्तर सारखेच असते. मूल्यमापनावेळी कोणताही घटक प्रभावित करीत नाही. वस्तुनिष्ठ प्रश्नांमध्ये,

१) बहुपर्यायी प्रश्न

२) व्दिपर्यायी प्रश्न

३) जोड्या लावा.

यासारख्या प्रश्नांचा समावेश असतो.

**iv) उपयोगिता-**

उपयोगितेलाच इंग्रजीत Usability असे म्हणतात. विद्यार्थ्यांच्या ज्या क्षमतेचे मूल्यमापन करावयाचे आहे, तीच क्षमता मोजली जात असेल तर ती चाचणी उपयुक्त (useful) आहे असे म्हणतात.

**v) भेदभावक्षमता-**

भेदभावक्षमता यालाच इंग्रजीत Discriminating Power असे म्हणतात. ज्या चाचणीमुळे विद्यार्थ्यांच्या क्षमता संपादनातील फरक तपासता येतो, त्याला चाचणीची भेदभावक्षमता असे म्हणतात.

**vi) पर्याप्तता-**

पर्याप्ततेलाच इंग्रजीत Adequacy असे म्हणतात. जेव्हा Syllabus मधील संपूर्ण घटकांचा समावेश चाचणीत असतो. तेव्हा ती चाचणी पर्याप्त आहे असे म्हणतात.

उपरोक्त चांगल्या चाचणींचा निकषामुळे विद्यार्थ्यांचे योग्य मूल्यमापन करुन विद्यार्थ्याला, पालकांना योग्य Feedback प्रत्याभरण देता येते. विद्यार्थ्यांची प्राविण्यता व कमकुवत बाजू सांगता येतात.

संशोधनात देखील निर्धारित नमुन्यांकडून माहिती संग्रहित करण्यासाठी जे संशोधन साधन संशोधकांकडून तयार केले जाते, अशा स्वनिर्मित साधनांच्या अंगी सुद्धा उपरोक्त बाबी लागू आहेत.

## संदर्भ

**शैक्षणिक मूल्यमापन** (पाचवी आवृत्ती, १९७६), पुणे : श्रीविद्या प्रकाशन.

**Evaluation in schools,** W. N. Dandekar, Mumbai : India Printing